ePaper

| वर्ष - 8 । अंक - 243 || UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | रविवार, दि. 23 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## महात्मा मोठा की भारतरत्न ? छगन भुजबळ यांच्या सवालाने नवा वाद ?



### आतील पानांत


- आरसीबीची ‘विराट’ सुरूवात
- सुनील नरेनने स्टंप्सवर मारली बॅट
- ब्राह्मणांवर गोळीबार!
- संविधानावर बुलडोझर चालविण्यासारखं


### अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्यांमध्ये हमरीतुमरी

# विद्यापीठाच्या अधिसभेत तुफान राडा!

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अधिसभेचा प्रारंभ वादळी चर्चा

। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अधिसभेचा प्रारंभ वादळी चर्चा, वाद, हमरीतुमरीने झाला. अधिसभा सदस्य आणि व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाच एकमेकांवर धावून जाण्याचा धक्कादायक प्रकार घडला. या प्रकारानंतर सुरक्षारक्षकांनी मध्यस्थी करीत वाद मिटवला. एका अधिसभा सदस्याने विद्यापीठ प्रशासनावर टीका करताना असंसदीय शब्दांचा वापर केल्याने विद्यापीठातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी एकत्र येत सभागृहातच ठिय्या आंदोलन करून घोषणाबाजी केली. या प्रकाराने कुलगुरूंवर अधिसभा स्थगित करण्याचीही वेळ आली.**




विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा शनिवारी सकाळी मुख्य इमारतीतील संत ज्ञानेश्वर सभागृहात सुरू झाली. अधिसभेच्या सुरुवातीला कुलगुरूंकडून अहवाल सादर केला जातो. मात्र, या वेळी अधिसभा सदस्यांच्या मागणीनुसार स्थगन प्रस्तावांवरील चर्चेने कामकाज सुरू करण्यात आले. सुरुवातीपासूनच अधिसभा सदस्यांनी व्यवस्थापन परिषदेतील सदस्यांवर गंभीर आरोप केले. विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमावरून अधिसभा सदस्यांनी काही व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांवर कार्यपद्धतीवर टीका केली. अधिसभा सदस्यांच्या आरोपांनंतर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या डॉ. ज्योत्स्ना एकबोटे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. एकबोटे म्हणाल्या, व्यवस्थापन परिषदेला लक्ष्य करण्यात येत आहे. सरसकट सागर वैद्य हे आरोपांना उत्तर देत असताना अधिसभा सदस्य अशोक सावंत आणि वैद्य हे एकमेकांवर धावून गेले. त्यामुळे सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. अधिसभा सदस्यांनी केलेल्या आरोपांमुळे विद्यापीठातील अधिकारी नाराज झाले. त्यामुळे विद्यापीठातील कर्मचारी संघटनेने सभागृहात येऊन घोषणाबाजी सुरू केली.

### अधिसभा सदस्याकडून महिलांबाबत अपशब्द

अधिसभा सदस्य सचिन गोरडे यांनी महिला कर्मचाऱ्यांबाबत असंसदीय शब्द वापरल्याने त्यांच्या निलंबनाची मागणी विद्यापीठातील कर्मचारी संघटनेने केली. त्यासाठी सभागृहात जोरदार घोषणाबाजी केली. निलंबन केल्याशिवाय मागे न हटण्याचा निर्णय या कर्मचाऱ्यांनी घेतला. या प्रकरणात कुलगुरूंना दोन-तीन वेळा हस्तक्षेप करावा लागला. अखेर गोरडे यांनी सभागृहात दिलगिरी व्यक्त केल्यानंतर कर्मचाऱ्यांनी आंदोलन स्थगित केले. कुलगुरूंनाही या प्रकाराबाबत खेद व्यक्त करावा लागला.

### जीवनसाधना गौरव पुरस्कारांवरून आरोप

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृतमहोत्सवी वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांसाठी प्रशासनाची झालेली पळापळ, जीवनगौरव पुरस्कारांच्या खैरातीवर अधिसभा सदस्यांनी आक्षेप घेतला. अधिसभेला विचारात न घेता, व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांच्या मर्जीतल्या व्यक्तींची पुरस्कारासाठी निवड केली जात असून, यामुळे विद्यापीठाची प्रतिमा मलीन होत असल्याचा आरोप सदस्यांनी केला.

# ...तर दंगेखोरांची प्रॉपर्टी विकणार!

## नागपूर राड्याप्रकरणी देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

नागपूरमध्ये सोमवारी मोठा हिंसाचार झाला, जमावाने आक्रमक होत दगडफेक केली, तोडफोड केली, पेट्रोल बॉम्बही फेकले. यात कोट्यवधींचे नुकसान झाले. या हिसांचारानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज पहिल्यांदाच नागपूरमध्ये आले, वरिष्ठ पोलीस आयुक्तांशी बैठक घेत त्यांनी सर्व आढावा घेतला. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधाताना त्यांनी प्रतिक्रिया दिली. दंगा करणाऱ्या प्रत्येकावर कारवाई होणार. कारवाई होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही असा इशारा



देवेंद्र फडणवीस यांनी दिला. या हिंसाचारात ज्यांचं नुकसान झालं त्यांना 3 ते 4 दिवसांत नुकसान भरपाई दिली जाईल. आत्ता जे काही नुकसान झालेलं आहे ते सगळं मुकसान दंगेखोरांकडून वसूल करण्यात येईल, दंगेखोरांनी ते पैसे भरले नाहीत तर त्यांची प्रॉपर्टी विकली जाईल असा थेट इशारा देत फडणवीसांनी आक्रमक भूमिका घेतली. औरंगजेबाची कबर सकाळी जाळण्यात आली. त्यानंतर काही लोकांनी तक्रार केली. पोलिसांनी तक्रार घेतली. मात्र, कबर जाळत असताना कुराणचे आयत लिहिलेली चादर जाळली असा भ्रम तयार करून काही लोकांनी सोशल मीडियातून अपप्रचार केला. त्यानंतर मोठ्या प्रमाणात संध्याकाळी जमाव आला, तोडफोड केली. जाळपोळ केली. लोकांवर हल्ला केला. पोलिसांनी चार पाच तासातच या संपूर्ण दंगलीला अटकाव केला.

### काय म्हणाले मुख्यमंत्री ?

नागपूरमध्ये जी घटना झाली, त्याचा संपूर्ण आढावा नागपूरचे पोलीस आयुक्त, एसपी आणि वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत मी घेतला. एकूण घटनाक्रम आणि त्यानंतर केलेली कारवाई या सगळ्यासंदर्भातील हा आढावा होता.. मुळातच काही गोष्टी मी सभागृहात स्पष्ट केल्या होत्या.

## जेजुरीतील जय मल्हार फाउंडेशनचा उपक्रम

# पशु-पक्ष्यांना प्यायला टँकरने पाणीपुरवठा!

### 4 महिने पाणीपुरवठा करावा लागणार यासाठी 240 टँकरची गरज

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**साऱ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या खंडेरायाच्या जेजुरी नगरीतील कडेपठारच्या डोंगर परिसरात अधिवास करीत असलेल्या पशु -पक्ष्यांचे प्यायला पाणी मिळत नसल्याने हाल सुरू झाले होते, मात्र येथील सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या जयमल्हार फाउंडेशनच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी डोंगरातील पाणवठ्यामध्ये टँकरने पाणी भरण्यास सुरुवात झाली आहे**



शुक्रवारी (दि.२१ ) जागतिक वन दिनाच्या निमित्ताने पशु-पक्ष्यांसाठी टँकरने पाणीपुरवठा व धान्य पुरवठा या सेवा कार्यास सुरुवात करण्यात आली. गेली अकरा वर्षे जयमल्हार फाउंडेशनचे अध्यक्ष विशाल बारभाई व त्यांचे सहकारी ,वन खाते व स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने हा सेवा प्रकल्प राबवीत आहेत. शुक्रवारी झालेल्या कार्यक्रमाच्या वेळी सचिन कुंभार व तुषार कुंभार यांनी पहिला टँकर दिला. यावेळी सासवड परिक्षेत्राचे वनक्षेत्रपाल सागर ढोले, जेजुरीचे वनपाल राहुल रासकर ,वनरक्षक सोनाली कांबळे ,वनसेवक गजानन बयास, वनरक्षक जी.आर .निरडे, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल सोनवणे, प्रा. रघुनाथ वाहुळ,समीर मोरे, अमोल भंडारी, मनोज बारसुडे आदि उपस्थित होते .मागील वर्षी कडेपठारच्या डोंगरात पुरेसा पाऊस न झाल्याने सारा डोंगर ओसाड झाला आहे. कुठेही पाण्याचे स्त्रोत शिल्लक नाहीत, त्यामुळे या डोंगरांमध्ये असणारे वन्यजीव सैराभैरा झालेत.या ठिकाणी वन खात्याने ८ ठिकाणी गोल हौद तयार करून पशुपक्ष्यांसाठी पाणवठे बनवलेले आहेत. या पाणवठ्यामध्ये लोकसहभागातून टँकरने पाणी भरण्याचा उपक्रम जय मल्हार फाउंडेशन राबवित आहे.

दररोज दोन टँकरप्रमाणे ४ महिने पाणीपुरवठा करावा लागणार असून यासाठी २४० टँकरची गरज आहे.कडेपठारचा डोंगर हा सह्याद्रीच्या रांगेमध्ये येतो .या परिसराला जयाद्री पर्वत असे संबोधले जाते. कडेपठारच्या डोंगरात कुलदैवत खंडोबाचे मूळ स्थान असून दररोज हजारो भाविक येथे देवदर्शनासाठी येत असतात. अनेक भाविकांना सायंकाळी गड चढताना हरीण ,मोरांचे दर्शनही घडते .या डोंगरात प्रामुख्याने हरीण ,चिंकारा, मोर, तरस ,लांडगे ,कोल्हे, सायाळ, ससा, खोकड ,आहे. पावसाळ्यामध्ये डोंगरात पुरेसे पाणी उपलब्ध असते,या प्राण्यांचे पाण्याअभावी हाल सुरू होतात .अनेक वेळा अन्न पाण्याच्या शोधार्थ यातील काही प्राणी मानवी वस्तीत येतात. या प्राण्यांना जागेवरच पाणी उपलब्ध व्हावे यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी हा उपक्रम गेल्या अकरा वर्षापासून यशस्वीपणे सुरू ठेवला आहे. सायंकाळी पाचनंतर बहुतांशी पाणवठ्यावर पाणी पिण्यासाठी प्राण्यांची गर्दी झालेली पाहायला मिळते. हेच पिण्याचे पाणी आजूबाजूच्या परिसरात चरायला गेलेल्या गाई म्हशी मेंढ्या शेळ्या यांनाही मिळते. या डोंगरात असलेल्या विविध पक्ष्यांची भूक भागावी म्हणून त्यांना पाणवठ्याच्या शेजारीच बाजरी, तांदूळ, ज्वारी, आदी धान्य टाकले जाते . पशुपक्ष्यांना धान्य व पाणी देण्याची योजना आता जेजुरी परिसरामध्ये लोकप्रिय झाली असून टँकर देण्यासाठी नंबर लागले आहेत. लग्नकार्य, वाढदिवस, वर्षश्राद्ध अशा कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक जण टँकर देतात .

### टँकर मिळण्यात खूप अडचणी

कडेपठारच्या डोंगरात हिरवीगार वनराई अत्यंत कमी असल्याने उन्हाळ्यात पशुपक्ष्यांचे हाल होतात. वनखाते दरवर्षी लागवड करून काही झाडे जगवत आहे मात्र डोंगरात वणवे लागण्याचे प्रकार सारखे घडत आहेत. त्यामुळे वनराई नष्ट होते. प्रामुख्याने झाडाखाली बसून गांजा, विडी, सिगरेट ओढणाऱ्यांमुळे या आगी लागत असल्याचे समजते. येणारे चार महिने टँकरने पाणी आणावे लागणार आहे .

## गुंडांकडून चार पिस्तुलांसह आठ काडतुसे जप्त

### अमन पटेल याच्याविरुद्ध अहिल्यानगर येथे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सराइतांकडून खंडणी विरोधी पथकाने चार पिस्तुलांसह आठ काडतुसे असा शस्त्रसाठा जप्त केला. या कारवाईत पोलिसांनी चौघांना अटक केली असून, आरोपींमध्ये तडीपार गुंडाचा समावेश आहे. नगर रस्त्यावरील वाघोली परिसरात ही कारवाई करण्यात आली.**



याप्रकरणी तडीपार गुंड अमन उर्फ मुन्ना दस्तगीर पटेल (वय २३, रा. बाकोरी फाटा,वाघोली), इशाप्पा ऊर्फ विशाल जगन्नाथ पंदी (वय २४, रा. गोकुळ पार्क, बकोरी फाटा, वाघोली), गोपाळ संजय यादव (वय २४, रा. वाघोली), देवानंद शिवाजी चव्हाण (वय २३, रा. मारुती आळी शिरुर) यांना अटक करण्यात आली. तडीपार गुंड वाघोलीतील एका सोसायटीत साथीदारांसह राहत असल्याची माहिती खंडणी विरोधी पथकातील पोलीस उपनिरीक्षक गौरव देव आणि अनिल कुसाळकर यांना मिळाली. त्यांच्याकडे देशी बनावटीची पिस्तूले, काडतुसे असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांच्या पथकाने तेथे छापा टाकला. पोलिसांनी या कारवाईत चार पिस्तुलांसह आठ काडतुसे जप्त केली.आरोपी गोपाळ यादव याच्याविरुद्ध दरोडा, खुनाचा प्रयत्न, अमन पटेल याच्याविरुद्ध अहिल्यानगर येथे गंभीर स्वरुपाचे तीन गुन्हे दाखल आहेत. आरोपी गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक छगन कापसे, उपनिरीक्षक गौरव देव, सहायक फौजदार सुनील पवार, अनिल कुसाळकर, चेतन आपटे, आजिनाथ येडे, अमोल घावटे, अमोल राऊत, सैदोबा भोजराव, सुरेंद्र जगदाळे, चेतन चव्हाण, दिलीप गोरे, पवन भोसले, प्रशांत शिंदे, आशा कोळेकर, रुपाली कर्णवर यांनी ही कारवाई केली.

### चार पिस्तुलांसह आठ काडतुसे जप्त

तडीपार गुंड वाघोलीतील एका सोसायटीत साथीदारांसह राहत असल्याची माहिती खंडणी विरोधी पथकातील पोलीस उपनिरीक्षक गौरव देव आणि अनिल कुसाळकर यांना मिळाली. त्यांच्याकडे देशी बनावटीची पिस्तूले, काडतुसे असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांच्या पथकाने तेथे छापा टाकला. पोलिसांनी या कारवाईत चार पिस्तुलांसह आठ काडतुसे जप्त केली.

### 22 के.व्ही. रोहित्राचे 11 के.व्ही. रोहित्रांमध्ये रूपांतरण करा

# महावितरण समस्यांबाबत मुख्यमंत्र्यांना "साकडे" !

## भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड : पिंपरी-चिंचवड शहरातील महावितरणच्या २२ के.व्ही. स्तराच्या रोहित्राचे ११ के.व्ही. रोहित्रांमध्ये रूपांतरण करावे आणि अखंडित वीज पुरवठा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**



याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवडमध्ये भोसरी गाव, तळवडे, चिखली, च-होली, दिघी, मोशी या भागात दाट लोकवस्ती आहे. तसेच, भोसरी एम.आय.डी.सी जे. एफ. एस व डी ब्लॉक, सेक्टर १० आणि १२ या ठिकाणी औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणारे बहुतांश कर्मचारी येथे राहतात. भोसरी मतदार संघामध्ये लघुदाब घरगुती ३ लाख ६२ हजार २१६, वाणिज्य ३७ हजार ४१५, औद्योगिक १७ हजार ७९२ इतर ४ हजार २४९ व उच्चदाब ५९३ ग्राहक आहेत. सदर ग्राहकांना प्राथमिक वितरण २२ के.व्ही. वीजस्तर विद्युत वाहिनीद्वारे वीजपुरवठा केला जातो.

शहरात इंद्रायणीनगर परिसरामध्ये दि.५ सप्टेंबर २०२० रोजी विद्युत प्राणांकित अपघात झाला होता. सदर अपघात २२/०.४३३ के.व्ही. विद्युत रोहित्र फुटून, रोहित्रातील तेल दूरवर फेकले गेले व हे गरम तेल तेथे जवळ राहत असलेल्या व्यक्तीवर पडून प्राणांकित अघपात घडला. तसेच २००९-१० मध्ये नेवाळे मळा २२/०.४३३ के.व्ही. विद्युत रोहित्र फुटून रोहित्रामधील तेल १००-१५० फुट दूर फेकले गेले व एक महिला सदर परिसरामध्ये भांडी धुत असताना महिलेच्या अंगावर तेल पडून सदर महिला ४५ टक्के भाजली. सदर घटना अतिशय दुर्दैवी आहेत. २२ के.व्ही. वीज स्तर उच्च क्षमता असल्यामुळे रोहित्रामधील बिघाट झाल्यास रोहित्रामधील तेलाचे तापमान व दबावात वाढ होते. उच्च तापमानामुळे तेलामध्ये गॅस तयार होतो, जो दबाव निर्माण करतो. हा दबाव नियंत्रित न झाल्यास रोहित्राची बाहय संरचना फाटते व स्फोट होऊन तेल जास्त दबावाने बाहेर दूरवर फेकले जाते.

सदर कारणामुळे अपघात होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे दाट लोकवस्तीमध्ये सदर प्रकारची अपघात होऊ नये यासाठी वीज वितरण प्रणालीमध्ये सुधारणांची आवश्यकता आहे. विशेषतः उच्च कार्यक्षमता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी २२ के. व्ही. व्होल्टेज क्षमता ११ के. व्ही. व्होल्टेजमध्ये रूपांतरण करणे गरजेचे आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

> पुणे परिसरामध्ये कोथरूड, वारजे माळवाडी, सांगवी, हिंजवडी, ताथवडे, पर्वती, कोंढवा, वानवडी सदर ठिकाणी घरगुती ग्राहकांसाठी २२ के. व्ही. व्होल्टेज क्षमतेचे ११ के.व्ही. व्होल्टेजमध्ये रूपांतरण करणेत आले आहे. तसेच, वाशी, मुंबई सदर ठिकाणी देखील घरगुती ग्राहकांसाठी २२ के. व्ही. व्होल्टेज क्षमतेचे ११ के.व्ही. व्होल्टेजमध्ये रूपांतरण करणेत आले आहे. याच धर्तीवर, शहरात सर्व ठिकाणी २२ के.व्ही. स्तराच्या रोहित्राचे ११ के.व्ही. रोहित्रांमध्ये रूपांतरण करावे. ज्यामुळे वीज वितरण प्रणाली अधिक सक्षम, स्थिर आणि विनाव्यत्यय होईल, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. त्यावर सकारात्मक निर्णय होईल, असा विश्वास आहे.
>
> **–महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

### 22 के. व्ही. वाहिनी पुरवठ्याच्या समस्या...

१) २२ के.व्ही. वितरणामध्ये अधिक उर्जा नुकसान होते. उच्च व्होल्टेज वीज वितरणातील लांब अंतर वरील वाहिनीमध्ये उच्च प्रतिकारामुळे जास्त उर्जा गमावली जाते व त्यामुळे एकूण कार्यक्षमता कमी होते.

२) २२ के.व्ही. वितरणासाठी सबस्टेशन, रोहित्र, वाहकतारा व भूमिगत वाहिनी इ. साधनांचा खर्च अधिक असतो.

३) २२ के.व्ही. वीज पातळीचे वितरण अधिक जास्त देखभाल व नियंत्रणाची आवश्यकता असते.

४) २२ के.व्ही. वीज स्तर अधिक क्षमतेचा असल्या कारणाने तांत्रिक दोष, अधिक असतात व वीज पुरवठ्यात अडचणी निर्माण होऊन अधिक वेळा वीज पुरवठा खंडीत होण्याची शक्यता वाढते.

५) २२ के.व्ही. वीज स्तराच्या वापरामुळे अधिक व्होल्टेज निर्माण होते. ज्यामुळे त्याच्या संपर्कात येणा-या व्यक्तींना अधिक धोका

---

### 'व्हिजन @५०' मध्ये सर्वच क्षेत्रांचा होणार समावेश

## ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात विविध विषयांवर विचारमंथन

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'पिंपरी चिंचवड महापालिका स्थापनेस २०३२ मध्ये ५० वर्षे पुर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने महापालिकेने 'व्हिजन@५० शहर धोरण' हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत सर्वच क्षेत्रांतील व्यक्तींशी संवाद साधून पिंपरी चिंचवड शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महापालिका प्रशासन प्रयत्नशील आहे असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले.**



'व्हिजन@५० शहर धोरण' उपक्रम अंतर्गत शनिवारी (२२ मार्च) ग.दि. माडगूळकर नाट्यगृह येथे बाह्य स्टेकहोल्डर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी मार्गदर्शन करताना जांभळे पाटील बोलत होते. या कार्यशाळेस शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता मनोज सेठीया,देवण्णा गट्टुवार, उप आयुक्त विठ्ठल जोशी, अण्णा बोदडे, संदीप खोत,पंकज पाटील, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार,सहायक आयुक्त उमेश ढाकणे, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत सुपेकर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी याप्रसंगी व्हिजन@५० बाबत बोलताना सांगितले की,'पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस ११ ऑक्टोबर २०३२ रोजी महापालिका स्थापनेपासून ५० वर्ष पूर्ण होत आहेत.

### विविध विषयांवर झाले विचारमंथन

व्हिजन@५० शहरी धोरण उपक्रमाअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत 'शहरी गतिशीलता', 'पर्यावरण आणि राहणीमान', 'शिक्षण आणि नागरी कल्याण', 'तंत्रज्ञान आणि प्रशासन', 'शहरी पायाभूत सुविधा', 'आर्थिक विकास' या प्रमुख विषयांवर सविस्तर चर्चा झाली. तसेच भविष्यात नागरी समस्या उद्भवल्या तर त्यासाठी कोणत्या उपाययोजना उपयुक्त ठरतील, यावरही विचारमंथन झाले.




# पॅलेस्टिनी 'प्रयोगशाळे'च्या गोष्टी...

**अँटनी लोवेनस्टिन यांचं 'द पॅलेस्टाइन लॅबोरेटरी' हे पुस्तक वाचत असताना अलीकडे माध्यमांत झालेले दोन वाद आपल्या डोळ्यांसमोर येतात. त्यातला एनएसओ या इस्रायली कंपनी-समूहाने विकसित केलेल्या पेगॅसस तंत्रज्ञानाचा वाद आपल्याला माहीत आहे.**

एखाद्या व्यक्तीच्या फोन किंवा लॅपटॉपमध्ये नकळत शिरून (थोडक्यात: हॅक करून) त्या व्यक्तीच्या सर्व प्रकारच्या संवादावर लक्ष ठेवून त्याची माहिती गोळा करण्याचं काम या तंत्रज्ञानाद्वारे केलं जातं. २०१९ मध्ये कॅलिफोर्नियामधल्या एका न्यायालयात व्हॉट्सॲपने इस्रायलमधल्या एनएसओ या कंपनीविरुद्ध एक खटला दाखल केला होता. त्या खटल्याचा निकाल २०२१ मध्ये लागला. जगातील एकूण १४०० व्यक्तींचे मोबाइल फोन हॅक करून त्या व्यक्तींवर पाळत ठेवली आणि त्यांच्याविषयी माहिती गोळा केली असं या खटल्यातल्या न्यायाधीशांनी या खटल्याचा निकाल देताना म्हटलं. या १४०० व्यक्तींपैकी ३०० जण भारतीय होते अशी माहिती पुढे आली. यानंतर बराच काळ यावर आपल्याकडे एनएसओ इस्रायली या कंपनी-समूहाने विकसित केलेल्या पेगॅसस तंत्रज्ञानावर वादळ उठलं होतं. आपले फोन हॅक झाले आणि त्याकरवी आपली माहिती शासनाने मिळवली असा



आरोप अनेक विरोधी पक्षीयांनी, शासनविरोधी पत्रकारांनी आणि समाजकारण्यांनी केला. या हॅकिंगविषयी अँटनी लोवेनस्टिन यांच्या पुस्तकात आलेला मजकूर आपल्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. नागपूरमधले वकील निहालसिंग राठोड हे शासनाविरोधी खटले लढवत असतात. भीमा कोरेगाव खटल्यात त्यांनी काही आरोपींच्या बाजूने वकिली केली आहे. त्यांचे फोन हॅक कसे केले गेले याबद्दल लोवेनस्टिन आणि राठोड यांच्यातले संवाद या पुस्तकात थोडक्यात दिले आहेत. आपली सत्तेवरची पकड मजबूत करण्यासाठी मोदींनी इस्रायली कंपन्यांच्या टेहेळणी तंत्रज्ञानाचा वापर केला असा आरोप लोवेनस्टिन यांनी या पुस्तकात केला आहे. या हॅकिंगविषयी जे काही घडतं त्यात एक समान घटनाक्रम आहे असं लोवेनस्टिन दाखवून देतात. प्रथम त्या त्या देशांचे नेते आणि नेतान्याहू यांच्या भेटी होतात. त्यानंतर हॅकिंगद्वारे पाळत ठेवणाऱ्या इस्रायली तंत्रज्ञानाचा त्या त्या देशांत प्रवेश होतो. रवांडा, अझरबैजान, एल साल्वादोर या देशांची उदाहरणं देऊन त्यांनी हा घटनाक्रम स्पष्ट केला आहे. अमेरिका, चीन, रशिया, ब्रिटन असे पुढारलेले देश हॅकिंगचं तंत्रज्ञान स्वत:च विकसित करू शकतात. इस्रायली कंपनीनं विकसित केलेल्या तंत्रज्ञानावर अवलंबून राहणं त्यांना सुरक्षित वाटत नाही. कारण अशी जमा केलेली माहिती इस्रायलच्या शासनापर्यंत जाण्याची जोखीम त्यात असते. स्वतंत्रपणे स्वदेशात हे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी बराच पैसा लागतो. विकसित देशांना ही अडचण नसते. पण बाकीच्यांचं तसं नाही. त्यामुळे पेगॅसस सारखं 'रेडीमेड' तंत्रज्ञान त्यांना कमी पैशात मिळतं. त्यामुळे विकसनशील देश हे तंत्रज्ञान वापरतात. याउलट आपल्या हितसंबंधांना धोका निर्माण झाला तर हे देश कसे आक्रमक होतात हे अमेरिकेचं उदाहरण घेऊन लोवेनस्टिन यांनी स्पष्ट केलं आहे. इस्रायल आणि अमेरिका यांच्यातले संबंध किती जवळचे आहेत हे जगाला माहीत आहे. तरीसुद्धा २०२१ मध्ये अमेरिकेच्या बायडेन प्रशासनाने एनएसओ कंपनी समूहाचं नाव त्यांच्या 'एन्टिटी लिस्ट' नावाच्या काळ्या यादीत टाकलं. या यादीतल्या कंपन्यांना अमेरिकन तंत्रज्ञान देण्यास बंदी आहे. एनएसओ आपल्या तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं अनेक देशांतल्या शासनांच्या टीकाकारांवर आणि स्वत:च्या अधिकाऱ्यांवर पाळत ठेवण्यासाठी वापरलं जात आहे असा आरोप अमेरिकेच्या वाणिज्य विभागानं केला. आणि 'अमेरिका आपल्या परराष्ट्र धोरणात मानवाधिकारांना मध्यवर्ती स्थान देण्याचा प्रयत्न करते आणि अशी डिजिटल तंत्रं दमनासाठी वापरली जात असल्यानं त्यांना आळा घालण्यासाठी' आपण हे पाऊल उचलत असल्याचा दावा या विभागानं केला. डेमोक्रॅटिक पक्षाच्या अनेक राजकारण्यांनी एनएसओवर आणखी कडक निर्बंध घालण्याची मागणी केली. सत्तेत असते तर अशी कारवाई होऊ शकली नसती असं मत यावर लोवेनस्टिन यांनी या पुस्तकात व्यक्त केलं आहे.

## प्रासंगिक »

### अद्भुताचे प्रवासी...

***रोजचे रखरखीत वास्तव जगणाऱ्यांना खरे तर जगात अद्भुत वगैरे काही असते किंवा घडू शकते, यावर विश्वासच ठेवता येत नाही. पण नुकतेच १९ मार्चच्या पहाटे अवघ्या जगाने एक अद्भुत बघितले.***

आठ दिवसांसाठी अंतराळात गेलेल्या आणि नऊ महिने (२८६ दिवस) त्रिशंकूसारखे तिथेच अडकून पडलेल्या आपल्या दोन अंतराळवीरांना अमेरिकेच्या नासाने स्पेसएक्सच्या सहकार्याने ज्या पद्धतीने सुखरूप पृथ्वीवर परत आणले ती खरोखरच अद्भुत या कोटीमधलीच घटना होती. ४२० किलोमीटर अंतरावर असलेल्या अंतराळ स्थानकातून १७ तासांचा प्रवास करून स्पेसएक्सची 'ड्रॅगन' ही कॅप्सूल किंवा अंतराळकुपी ठरल्या दिवशी, ठरल्या वेळी, चारही पॅराशूट्स नियोजनाप्रमाणेच उघडून अलगद समुद्रात उतरलीअंतराळकुपी पृथ्वीच्या वातावरणात सुखरूपपणे शिरल्यापासून अंतराळवीरांना त्यातून बाहेर काढून वैद्याकीय तपासणीसाठी पाठवेपर्यंतचा दोन तासांचा घटनाक्रम कोणत्याही थरारक चित्रपटापेक्षा कमी नव्हता.

**काल रात्री रोजच्या प्रमाणे दहाच्या बातम्या पाहायला बसलो आणि सगळी च्यानले नागपुरातील महल या जुन्या गर्दीच्या परिसरात घडलेल्या दगडफेकीच्या घटनेची, पेटवल्या गेलेल्या वाहनाची, फोडलेल्या काचांची, वरून फेकलेल्या दगड विटांची दृश्ये आणि माहिती सांगत आणि कोणाच्या काय प्रतिक्रिया आहेत.**

# नागपुरातील दगडफेक परंपरेला शोभणारी आहे का?

शांतता राखा आणि अफवांवर विश्वास ठेऊ नका या पलीकडे कुणी जबाबदारीने बोलले नाही. सगळे नको ते घडून गेल्यावर परिस्थिती नियंत्रणात आहे हे पालुपद आळविले जात होते. तो वाद उघड उघड दोन धर्मांतील होता, मात्र ही दोन गटांत झालेली हाणामारी आहे, असे सांगितले जात होते. आपल्या उच्च परंपरा आठवून शांतता राखा असे सांगणाऱ्या शांतीदूतांनी आपल्या पक्षातील वाचाळवीरांना वेळीच आवरले असते, तर अधिक बरे झाले असते.औरंगजेबाची कबर गेली किमान अडीच तीन शतके औरंगाबादेत, म्हणजे आताच्या संभाजी नगर परिसरात आहे. मुस्लीम धर्मात मृतदेह दफन करण्याची पद्धत आहे. औरंगजेब हा राजा होता, तो दीर्घायुषी होता आणि जवळपास सात दशके त्याचा अंमल त्या काळच्या अर्ध्याहून अधिक हिंदुस्थानावर होता. त्याची राजवट जुलमीच होती. मागील ५०० वर्षांचा इतिहास पाहिला तर २५० वर्ष मोघल, निझाम, इंग्रज दीडशे वर्ष



आणि भारत स्वतंत्र झाल्यावर काँग्रेस ६० वर्ष अशी ढोबळ विभागणी होते. नाव हिंदुस्तान असले तरीही संपूर्ण भारतावर एकछत्री हिंदू अंमल कधीही नव्हता.जो याच मातीत जन्माला आला, सत्ता राबवली आणि इथेच मृत्यू पावला त्याची कबर इथे असण्यात मान खाली जावी असे काहीही नाही. सुमारे ४५ वर्षांपूर्वी मी शाळेत असताना वेरूळ अजिंठा, दौलताबाद, औरंगाबाद अशा सहलीला गेलो होतो. ही ठिकाणे ऐतिहासिक, कलात्मक वास्तू इत्यादी असल्याने इतिहासाचे शिक्षक बरोबर होते. तेव्हा त्यांनी वाटेत लागणारी औरंगजेबाची कबर आवर्जून दाखवली होती. राजांच्या पराक्रमाचे प्रतीक म्हणून ती दाखविली गेली. ती पाहिली म्हणून आम्हला पालक ओरडले नाहीत, की त्या गुरुजींना जाब विचारला नाही. त्यामुळे आता म्हणजे छावा सिनेमा पाहिल्यावर ती पाडून टाकू, उखडून फेकू ही भाषा सामाजिक स्वास्थ्य बिघडवणारी आहे. औरंगजेबाचा मृत्यू शिवाजी महाराजांच्या आधी झाला असता तर त्यांनी ही असे काही होऊ दिले नसते. याच संदर्भात आणखी दोन दाखले देता येतील.अफजल खानाच्या वधानंतर, त्याच्या देहाची विटंबना होऊ न देता, राजांनी पुरेशा गांभीर्याने तो मृतदेह दफन केला. श्रीरामाने रावणाचा वध केल्यानंतर त्याच्या देहाला नमस्कार केला होता आणि प्रदीर्घ स्वगत केले होते. लक्ष्मणाला बजावले, ही वेळ उन्माद करण्याची नाही, तो ही एक सम्राट होता आणि शंकराचा भक्त. जे घडले ते अटळ होते, ते विवेचन फार अर्थपूर्ण आहे. रामायण मालिकेत ते आजही पाहायला मिळते. असा गौरवास्पद वारसा आहे या भूमीला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।<br>
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।<br>
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# डोळे तपासण्याचा व्यवसाय सुरु केला?

## अजितदादांच्या इफ्तार पार्टीतील विधानावर नारायण राणेंची प्रतिक्रिया

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार आज मुंबईत एका इफ्तार पार्टीला उपस्थिती लावली होती. यावेळी आपल्या भाषणात त्यांनी रमजानचे बंधुत्वाचा संदेश देणारा महिना म्हणून वर्णन केले आणि मुस्लिम समुदायातील लोकांना आश्वासन दिले की, जर कोणी त्यांच्याकडे डोळे वटारून पाहण्याचे धाडस केले तर ते त्याला सोडणार नाहीत.**



दरम्यान अजित पवार यांच्या या विधानानंतर यावर त्यांचा मित्रपक्ष असलेल्या भाजपातून प्रतिक्रिया यायला सुरुवात झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीवस आणि दिल्लीचे खासदार मनोज तिवारी यांच्यानंतर खासदार नारायण राणे यांनीही अजित पवार यांच्या विधानावर प्रतिक्रिया दिली असून, “अजित पवारांनी डोळे तपासण्याचा नवीन व्यवसाय सुरू केला आहे असं वाटतं”, म्हटले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या “आमच्या मुस्लिम बांधवांकडे डोळे वटारून पाहण्याऱ्याला सोडणार नाही…” या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना भाजपा खासदार नारायण राणे म्हणाले, “असे दिसते की अजित पवारांनी डोळे तपासण्याचा एक नवीन व्यवसाय सुरू केला आहे.”इफ्तार पार्टीत बोलताना अजित पवार म्हणाले होते की, “जो कोणी आपल्या मुस्लिम बांधवांकडे डोळे वटारून पाहण्याचे धाडस करेल, दोन गटांमध्ये संघर्ष निर्माण करून कायदा आणि सुव्यवस्था बिघडवेल आणि कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करेल, तो कोणीही असो, त्याला कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही किंवा माफ केले जाणार नाही.” मुस्लिमांच्या पवित्र रमजान महिन्यानिमित्त मुंबईतील इस्लाम जिमखाना येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाकडून इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अजित पवार, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, सना मलिक, नवाब मलिक आणि पक्षाचे इतर ज्येष्ठ नेते उपस्थित होते. यावेळी मुस्लिम समाजातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान, अजित पवार यांच्या इशाऱ्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही यावर प्रतिक्रिया दिली आहे. फडणवीस यांनीही चांगले काम करणाऱ्या आणि देशभक्त व्यक्तीला कोणी त्रास दिला तर त्याला सोडणार नसल्याचे म्हटले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना फडणवीस म्हणाले, “अजित पवार काय म्हणाले हे मला माहिती नाही, कोणत्याही जाती किंवा धर्मातील चांगले काम करणाऱ्या आणि देशभक्त व्यक्तीला त्रास दिला आणि दोषी आढळला तर त्याला सोडले जाणार नाही.” अजित पवार यांच्या या विधानानंतर यावर त्यांचा मित्रपक्ष असलेल्या भाजपातून प्रतिक्रिया यायला सुरुवात झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीवस आणि दिल्लीचे खासदार मनोज तिवारी यांच्यानंतर खासदार नारायण राणे यांनीही अजित पवार यांच्या विधानावर प्रतिक्रिया दिली असून, “अजित पवारांनी डोळे तपासण्याचा नवीन व्यवसाय सुरू केला आहे असं वाटतं”, म्हटले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या “आमच्या मुस्लिम बांधवांकडे डोळे वटारून पाहण्याऱ्याला सोडणार नाही…” या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना भाजपा खासदार नारायण राणे म्हणाले, “असे दिसते की अजित पवारांनी डोळे तपासण्याचा एक नवीन व्यवसाय सुरू केला आहे.”इफ्तार पार्टीत बोलताना अजित पवार म्हणाले होते की, दोन गटांमध्ये संघर्ष निर्माण करून कायदा आणि सुव्यवस्था बिघडवेल आणि कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करेल, तो कोणीही असो, त्याला कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही किंवा माफ केले जाणार नाही.

### काय म्हणाले होते अजित पवार?

”मुस्लिमांच्या पवित्र रमजान महिन्यानिमित्त मुंबईतील इस्लाम जिमखाना येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाकडून इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अजित पवार, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, सना मलिक, नवाब मलिक आणि पक्षाचे इतर ज्येष्ठ नेते उपस्थित होते. यावेळी मुस्लिम समाजातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान, अजित पवार यांच्या इशाऱ्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही यावर प्रतिक्रिया दिली आहे. फडणवीस यांनीही चांगले काम करणाऱ्या आणि देशभक्त व्यक्तीला कोणी त्रास दिला तर त्याला सोडणार नसल्याचे म्हटले आहे.

# विमानाला विलंब झाल्याने सुप्रिया सुळे संतापल्या!

## एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट शेअर केली

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विमान प्रवास करताना प्रवाशांना अनेकदा अडचणींचा सामना करावा लागत असल्याचं पाहायला मिळतं. अनेकदा विमानाला उशीर होतो, त्यामुळे प्रवासी नाराजी व्यक्त करतात. मात्र, तरीही काहीही पावलं उचलली जात नाहीत. मात्र, आता यावरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. कारण असाच अनुभव खासदार सुप्रिया सुळे यांनाही आला आहे. त्यामुळे त्यांनी याबाबत एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर केली आहे.**




एअर इंडियाच्या विमानाला विलंब झाल्यामुळे सुप्रिया सुळे यांनी एअर इंडियाबाबत नाराजी व्यक्त करत विमानाला उशीर होणं हे कायमचंच झालं आहे. प्रवाशांना मनस्तापाला सामोर जावं लागत असून हे अस्वीकार्य आहे. केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी याकडे लक्ष देण्याची विनंती सुप्रिया सुळे यांनी केली. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.एअर इंडियाच्या विमानांना अविरत विलंब होत आहे, हे अस्वीकार्य आहे. आम्ही प्रीमियम भाडे देतो, तरीही विमाने कधीच वेळेवर येत नाहीत. व्यावसायिक, मुले आणि ज्येष्ठ नागरिक या सर्वांनाच या सततच्या गैरव्यवस्थापनाचा फटका बसतो. नागरी विमान वाहतूक मंत्र्यांना कारवाई करण्याचे आणि एअर इंडियाला जबाबदार धरण्याचे आवाहन आहे”, असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे. दरम्यान, खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्र सरकारला एअरलाइनच्या सततच्या गैरव्यवस्थापनाच्या विरोधात त्वरित कारवाई करण्याची विनंती केली. तसेच संबंधित एअरलाइन्सना जबाबदार धरण्यासाठी कठोर नियम लागू करण्याची विनंती सुप्रिया सुळे यांनी नागरी विमान वाहतूक मंत्र्यांकडे केली आहे.खासदार सुप्रिया सुळे यांनी एअर इंडियाच्या विमानाला झालेल्या विलंबाबाबत केलेल्या पोस्टला उत्तर देताना एअर इंडियाने म्हटलं की, “आम्हाला माहित आहे की विलंब खूप निराशाजनक असू शकतो. तथापि कधीकधी आमच्या नियंत्रणाबाहेरील ऑपरेशनल समस्या असतात, ज्या फ्लाइट वेळापत्रकावर परिणाम करू शकतात. अशा समस्येमुळे आज संध्याकाळी तुमचे मुंबईला जाणारे विमान एक तास उशिरा पोहोचले. आम्ही तुमच्या समजुतीचे कौतुक करतो”, असं एअर इंडियाने दिलेल्या उत्तरात म्हटलं आहे. एअर इंडियाच्या विमानाला विलंब झाल्यामुळे सुप्रिया सुळे यांनी एअर इंडियाबाबत नाराजी व्यक्त करत विमानाला उशीर होणं हे कायमचंच झालं आहे

### आम्ही प्रीमियम भाडे देतो

. प्रवाशांना मनस्तापाला सामोर जावं लागत असून हे अस्वीकार्य आहे. केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी याकडे लक्ष देण्याची विनंती सुप्रिया सुळे यांनी केली. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.एअर इंडियाच्या विमानांना अविरत विलंब होत आहे, हे अस्वीकार्य आहे.

# महायज्ञासाठी आलेल्या ब्राह्मणांवर गोळीबार!

## महायज्ञशाळेचे मुख्य द्वार तोडले; एका ब्राह्मणाला गोळी लागली

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शनिवारी सकाळी ९.३० वाजता हरियाणातील कुरुक्षेत्र येथे महायज्ञात सहभागी होण्यासाठी आलेल्या ब्राह्मणांवर आयोजकांच्या सुरक्षा रक्षकांनी गोळीबार केला. ज्यामध्ये लखनौहून आलेल्या ब्राह्मण आशिष तिवारीला गोळी लागली. यामुळे ब्राह्मण संतापले. यानंतर, त्यांच्यात आणि आयोजकांनी नियुक्त केलेल्या खासगी एजन्सीच्या सुरक्षा रक्षकांमध्ये भांडण झाले. यामध्ये लखीमपूर येथील रहिवासी प्रिन्स शुक्ला हेही जखमी झाले. सुमारे २१ इतर ब्राह्मण जखमी झाले आहेत.**



सुरक्षा रक्षकांनी गोळीबार केला., यानंतर ब्राह्मण संतप्त झाले. ते यज्ञशाळेतून बाहेर आले आणि त्यांनी तोडफोड आणि दगडफेक सुरू केली. संतप्त ब्राह्मणांनी महायज्ञशाळेचे मुख्य द्वार तोडले. रस्त्यावरील बॅनर आणि होर्डिंग्जही काठ्या आणि दगडांनी फाडण्यात आले. त्यानंतर त्यांनी थीम पार्कच्या बाहेर कुरुक्षेत्र-कैथल रस्ता रोखला. त्यांनी तेथून जाणारी वाहने जबरदस्तीने थांबवण्यास सुरुवात केली. दंगलीची माहिती मिळताच कुरुक्षेत्र पोलिस तिथे पोहोचले. पोलिसांनी ब्राह्मणांना शांत करण्याचा प्रयत्न केला. जेव्हा ते सहमत झाले नाहीत तेव्हा पोलिसांनी सौम्य लाठीमार केला आणि ब्राह्मणांना तेथून हाकलून लावले. सध्या पोलिसांनी ब्राह्मणांना रस्त्यावरून हटवले आहे. शहरात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. वातावरण अजूनही तणावपूर्ण आहे. उज्जैन, बनारस, वृंदावन, लखनौ, लखीमपूर आणि दमोह येथील ब्राह्मणही यज्ञशाळेत आले आहेत. त्यांचा आरोप आहे की त्यांना येथे शिळे अन्न दिले जात आहे. एका ब्राह्मणाला गोळी लागली आणि दुसऱ्याला दगड लागला असे पोलिसांचे म्हणणे आहे. गोळीबार केल्याचा आरोप असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जात आहे.शिळे अन्न खाण्यास विरोध केला होता या मुद्द्यावर निषेध करणाऱ्या ब्राह्मणांनी सांगितले की त्यांना सतत शिळे अन्न दिले जात आहे. ज्याच्या निषेधार्थ, त्यांनी यापूर्वी आयोजकांच्या बाउन्सर्सशी म्हणजेच रक्षकांशी वाद घातला होता. ब्राह्मणांनी असाही आरोप केला की पहिल्या दिवसापासून बाबांचे सुरक्षा रक्षक (बाउन्सर) त्यांना कोणत्या ना कोणत्या कारणासाठी त्रास देत होते. ते कधी कधी कोणाला मारहाणही करायचे. जर कोणी फिरताना दिसले तर त्यालाही चापट मारली जायची किंवा काठीने मारहाण केली जायची. गोळीने जखमी झालेले ब्राह्मण म्हणाले- नाश्त्याला दुर्गंधी येत होती. कुरुक्षेत्र पोलिस प्रवक्ते नरेश सागवाल म्हणाले, कुरुक्षेत्र थीम पार्क येथे १००८ कुंडीय जन कल्याण महायज्ञादरम्यान सकाळी ९.३० वाजता सैनी धर्मशाळेत नाश्ता करण्यासाठी गेलेल्या काही ब्राह्मण आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांमध्ये किरकोळ वाद झाला. दरम्यान, सुरक्षा रक्षकाने चालवलेली गोळी एका ब्राह्मणाला लागली. दगडफेकीत एक तरुण जखमी झाला. जखमी दोन्हीही धोक्याबाहेर आहेत आणि त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी आरोपींविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. जाम देखील शांततेत मोकळा झाला आहे. कोणताही बळाचा वापर करण्यात आला नाही. नाश्त्याला वाईट वास प्रयागराजच्या हरिओम बाबा यांनी १००८ कुंडीय यज्ञ आयोजित केले आहेत. यामध्ये १००८ ब्राह्मणांना पाचारण करण्यात आले. सुरुवातीला वृंदावनातील ७० ब्राह्मणांना मारहाण झाली, ते पळून गेले. आज यज्ञानंतर ब्राह्मण नाश्ता करायला गेले. नाश्त्याला वाईट वास येत होता. त्यांनी विरोध केला तेव्हा गार्डने त्यांना शिवीगाळ केली. तो म्हणाला की तो बाबांकडे तक्रार करणार आहे. यावर गार्डने त्यांच्यावर काठीने हल्ला केला. विटा फेकल्या. हे सुरक्षा रक्षक खाजगी आहेत, ज्यांना सरकारी सुरक्षा म्हणून घोषित करून येथे तैनात करण्यात आले आहे.यज्ञाचे आयोजक स्वामी हरि ओम दास म्हणाले - आमच्यावर जे काही आरोप आणि प्रतिआरोप केले जात आहेत ते ठीक आहे, परंतु यज्ञ पूर्ण व्हावा अशी माझी मनापासून इच्छा आहे. जर काही चूक झाली असेल तर त्याची चौकशी करून योग्य शिक्षा दिली पाहिजे. स्वरूपात येतो आणि आग लावतो हे मी कसे ओळखू शकतो? काही षड्यंत्रकारी कोणत्याही प्रकारे यज्ञ नष्ट करू इच्छितात.

### यज्ञ नष्ट करण्याचा कट

सुरक्षा रक्षकांनी गोळीबार केला., यानंतर ब्राह्मण संतप्त झाले. ते यज्ञशाळेतून बाहेर आले आणि त्यांनी तोडफोड आणि दगडफेक सुरू केली. संतप्त ब्राह्मणांनी महायज्ञशाळेचे मुख्य द्वार तोडले. रस्त्यावरील बॅनर आणि होर्डिंग्जही काठ्या आणि दगडांनी फाडण्यात आले. त्यानंतर त्यांनी थीम पार्कच्या बाहेर कुरुक्षेत्र-कैथल रस्ता रोखला.

# हे संविधानावर बुलडोझर चालविण्यासारखं

## सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश उज्जल भुयान यांचे परखड भाष्य

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**नागपूरमध्ये दंगल भडकविणाऱ्या आरोपींकडून मालमत्तेचे झालेले नुकसान वसूल केले जाणार आहे. जे आरोपी पैसे चुकवणार नाहीत, त्यांची संपत्ती जप्त केली जाईल आणि गरज पडल्यास त्यावर बुलडोझर चालविले जाईल, अशी भूमिका महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर येथे बोलताना मांडली. तर आजच सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश उज्जल भुयान यांनीही देशातील विविध राज्यात आरोपींच्या घरावर होणाऱ्या बुलडोझर कारवाईबाबत मोठे भाष्य केले आहे.**




पुण्यातील भारती विद्यापीठाच्या न्यू लॉ कॉलेजमधील १३ व्या न्या. पीएन भगवती आंतरराष्ट्रीय मुट कोर्ट स्पर्धेत प्रमुख पाहुणे म्हणून आलेल्या न्या. भुयान यांनी राज्यातील बुलडोझर कारवाईबाबत परखड भाष्य केले. न्यायाधीश उज्जल भुयान म्हणाले, "अनेक राज्यांमध्ये बुलडोझर न्यायाची पद्धत सुरू झाली आहे. आधी आरोपीच्या घरावर बुलडोझर चालविले जाते आणि नंतर या कारवाईचे समर्थन करण्यासाठी सदर बांधकाम कसे अनधिकृत होते, हे सिद्ध केले जाते. सदर प्रकार अतिशय वाईट आणि खेदजनक आहे."माझ्या मताप्रमाणे, संपत्ती जमीनदोस्त करण्यासाठी बुलडोझर वापरणे हे संविधानावरच बुलडोझर चालविण्यासारखे आहे. हे कायद्याच्या राज्याच्या संकल्पनेचे उल्लंघन केल्यासारखे आहे. हे जर वेळीच रोखले नाही तर आपली न्यायदानाच्या व्यवस्थेची इमारत कोसळेल", असे न्या. भुयान म्हणाले. न्या. भुयान पुढे म्हणाले, "ज्याचे घर पाडले जाते, तो संशयित आरोपी असेल किंवा त्याच्यावर पुढे जाऊन गुन्हा सिद्ध होईल. पण त्या पाडलेल्या घरात फक्त आरोपी राहतो का? तिथे त्याची आई, बहीण, पत्नी आणि मुलेही राहत असतील. त्यांची काय चूक आहे? जर तुम्ही घर पाडले, तर ते लोक कुठे जाणार? त्यांच्या डोक्यावरचे छप्पर हिरावून घेणे योग्य होईल का? त्यांच्याच कशाला आरोपीच्याही डोक्यावरचे छप्पर काढून घेणे न्याय होणार नाही. दोषसिद्धीचे काय. त्याच्यावर फक्त गुन्हा दाखल झाला आहे, म्हणून एखाद्याचे घर पाडता येणार नाही."न्या. भुयान पुढे म्हणाले, "आपल्या न्यायव्यवस्थेत सुधारणा अपेक्षित आहेत. आपले सर्वोच्च न्यायालय हे जगातील सर्वात शक्तीशाली न्यायालय आहे, असे म्हणणे पुरेसे ठरणार नाही

### व्यवस्थेत सुधारणा आवश्यक

भारतीय न्यायव्यवस्थेत सुधारणेला मोठा वाव आहे, असे माझे मत आहे."नागपूरमध्ये दंगल भडकविणाऱ्या आरोपींकडून मालमत्तेचे झालेले नुकसान वसूल केले जाणार आआणि गरज पडल्यास त्यावर बुलडोझर चालविले जाईल, अशी भूमिका महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर येथे बोलताना मांडली.

# तेजश्री प्रधान तुझी बहीण आहे का?

भूषण प्रधान हा सध्या मराठी सिनेविश्वातील आघाडीचा अभिनेता आहे. भूषणने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. गेल्या वर्षी भूषणचे दोन चित्रपट 'जुनं फर्निचर' आणि 'घरत गणपती' हे चांगलेच गाजले. चित्रपटांमध्ये तो प्रमुख भूमिकेत झळकला होता. या चित्रपटातील त्याच्या कामाचं भरभरून कौतुक करण्यात आलं होतं. नुकताच २०२५मधील त्याचा पहिला चित्रपट प्रदर्शित झाला. 'गाव बोलावतो' असं भूषणच्या नव्या चित्रपटाचं नाव असून २१ मार्चपासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला आहे. त्यामुळे सध्या भूषण चर्चेत आहे. 'गाव बोलावतो' या चित्रपटात भूषण प्रधानसह गौरी नलावडे, माधव अभ्यंकर, श्रीकांत यादव असे अनेक कलाकार मंडळी महत्त्वाच्या भूमिकेत झळकले आहेत. या चित्रपटानिमित्ताने भूषण सध्या वेगवेगळ्या एंटरटेनमेंट वृत्तसंस्थेशी संवाद साधताना दिसत आहे. याचवेळी भूषणने एक किस्सा सांगितला, जो सध्या चर्चेत आला आहे.'कलाकृती मीडिया'शी संवाद साधताना भूषण प्रधानला विचारलं की, तू कधी सिग्नल तोडला आहेस का? आणि तुला पकडलं का? तेव्हा भूषण किस्सा सांगत म्हणाला, "हो. आजकाल मी कमी सिग्नल तोडतो. अगदी होतं नाही असं नाही. मला नियम पाळायला खूप आवडतात. पण एकदा मी आधी जिथे राहायचो तिथे सिग्नल तोडला होता. त्याच्या काही दिवस आधी तिथेच तेजश्री प्रधानने सिग्नल तोडला होता. मी जेव्हा पकडलो गेलो तेव्हा पोलिसांनी माझ्या आयडीवर नाव पाहिलं आणि म्हणाले, भूषण प्रधान...अभिनेते...हे वाचताच त्यांनी, तेजश्री प्रधान तुमची बहीण आहे का? तिने पण सिग्नल तोडला होता. तुम्ही दोघे भाऊ-बहीण असेच आहात का? मी म्हटलं, आम्ही अजिबात भाऊ बहीण नाही आहोत. त्यानंतर मी तेजश्री प्रधानला फोन केला आणि म्हटलं, तू सिग्नल तोडला होता का? कारण मला सुद्धा तुला पकडलेल्याच पोलिसाने पकडलं होतं. मी सुद्धा सिग्नल तोडला."पुढे भूषण प्रधान म्हणाला की, सिग्नल तोडल्यानंतर दंड भरायला मला काहीही वाटतं नाही. कारण ती चूक आहे. त्यामुळे दंड भरला पाहिजे. बऱ्याच वेळेला मला जाऊन दिलेलं आहे. कारण कलाकारांचं विशेष कौतुक केलं जातं. आतापर्यंत एकदाही सिग्नल न तोडलेला व्यक्ती कोण असेल, असं मला वाटतं नाही.दरम्यान, भूषण प्रधानच्या कामाबद्दल बोलायचं झालं, तर त्याचा 'स्वप्नसुंदरी' नावाचा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. काही दिवसांपूर्वीच या चित्रपटाचा मुहूर्त सोहळा पार पडला आणि चित्रीकरणाला सुरुवात झाली. अक्षय शिंदे दिग्दर्शित 'स्वप्नसुंदरी' या चित्रपटात भूषणसह सायली पाटील पाहायला मिळणार आहे.



## मी खूप घाबरले होते

२०२३मध्ये नवाजुद्दीन सिद्दिकीचा 'टिकू वेड्स शेरू' नावाचा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात नवाजुद्दीन सिद्दिकी २८ वर्षांनी लहान असलेल्या अभिनेत्रीबरोबर रोमान्स करताना पाहायला मिळाला होता. याची चर्चा खूप रंगली होती. या चित्रपटातील दोघांचा किसिंग सीनवरून खूप ट्रोल केलं होतं. 'टिकू वेड्स शेरू'मध्ये नवाजुद्दीनबरोबर झळकलेली ही अभिनेत्री आता पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. नुकत्याच एका मुलाखतीमधून तिने आजवरच्या करिअरमध्ये घडलेले वाईट प्रसंग सांगितले. 'टिकू वेड्स शेरू' या चित्रपटात नवाजुद्दीन सिद्दिकीसह रोमान्स करणारी ही अभिनेत्री म्हणजे अवनीत कौर. खूप लहान वयात अवनीतने मनोरंजनविश्वात स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं. अलीकडचे अवनीतचं नाव भारतीय क्रिकेटर शुभमन गिलबरोबर जोडलं गेलं होतं. त्यामुळे ती खूप चर्चेत आली होती. त्यानंतर अवनीतने 'हाउटरफ्लाइ'ला मुलाखत दिली. यावेळी तिने तिच्याबरोबर घडलेले वाईट प्रसंग सांगितले. अवनीत कौरने सांगितलं, जेव्हा ती आठ वर्षांची होती, तेव्हा तिला चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला होता. डान्स रिहर्सलदरम्यान एक व्यक्ती सतत तिला इकडे-तिकडे स्पर्श करत होता. तेव्हा तिने याबाबत तिच्या आईला सांगितलं. त्यावेळी तिच्या आईने वाईट स्पर्श आणि चांगला स्पर्श याबाबत सांगितलं. तेव्हापासून अवनीतने या सगळ्या गोष्टी लक्षात ठेवल्या होत्या.त्यानंतर अवनीतबरोबर वयाच्या ११व्या वर्षी एका दिग्दर्शकाने गैरवर्तन केलं. ती म्हणाली की, जेव्हा मी स्ट्रगल करत होते.



## अभिनेत्रीने डेटिंगच्या चर्चांवर अखेर मौन

'बिग बॉस 13' फेम माहिरा शर्मांचे फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. माहिरी ही पापाराझींच्या आवडत्या स्टार्सपैकी एक आहे. अनेकदा पापाराझी तिचे व्हिडीओ शेअर करत असतात. पारस छाबराबरोबर माहिराचं ब्रेकअप झाल्यानंतर तिचं नाव भारतीय क्रिकेटर मोहम्मद सिराजसोबत जोडलं जात आहे. दोघेही एकमेकांना पसंत करतात आणि एकमेकांना डेट करत आहेत, अशा चर्चा होत्या. या चर्चा मागील अनेक महिन्यांपासून सुरू आहेत. दोघांनाही या नात्याबद्दल विचारलं जात होतं. अखेर माहिरा शर्मांने खरं काय ते सांगितलं आहे. तसेच सिराजनेही आयपीएल सुरू होण्यापूर्वी माहिराबरोबरच्या डेटिंगच्या चर्चांवर मौन सोडलं आहे. प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री माहिरा शर्मा क्रिकेटर मोहम्मद सिराजला डेट करत असल्याच्या बातम्या बऱ्याच दिवसांपासून येत आहेत. दोघेही नात्यात असून त्यांना नातं गुपित ठेवायचं आहे, असं बोललं जात होतं.

## राकेश पांडे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन!

ज्येष्ठ अभिनेते राकेश पांडे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. त्यांनी २१ मार्च २०२५ रोजी सकाळी अखेरचा श्वास घेतला. हृदयविकाराचा झटका आल्यानंतर त्यांना मुंबईतील जुहू येथील आरोग्यनिधी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, तिथे त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. राकेश पांडे हे ७७ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाची माहिती त्यांच्या मुलीने दिली आहे. आज (२२ मार्च रोजी) त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. राकेश पांडे यांची मुलगी जसमीत हिने वडिलांच्या निधनाची पुष्टी केली.एबीपी न्यूजला माहिती देताना जसमीतने सांगितलं की गुरुवार आणि शुक्रवारी (२०-२१ मार्च) पहाटे तीन वाजता तिच्या वडिलांनी अस्वस्थ वाटतंय व छातीत दुखतंय अशी तक्रार केली होती. नंतर त्यांना तातडीने आरोग्य निधी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र, त्यांच्या प्रकृतीत कोणतीही सुधारणा झाली नाही. शुक्रवारी सकाळी ८.५१ वाजता त्यांचे निधन झाले.राकेश पांडे यांचा जन्म हिमाचल प्रदेशमध्ये झाला होता. त्यांनी १९६९ मध्ये 'सारा आकाश' या चित्रपटातून आपल्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. यामध्ये त्यांनी समर ही भूमिका साकारली होती. या चित्रपटातील अभिनयासाठी त्यांना पुरस्कार देण्यात आला होता. त्यांनी हिंदी आणि भोजपुरी चित्रपटात बरीच वर्षे काम केलं. १९७८ मध्ये आलेल्या 'मेरा रक्षक'मध्ये त्यांनी मंगलची भूमिका साकारली होती. या भूमिकेमुळे त्यांना खूप ओळख मिळाली.राकेश पांडे यांनी त्यांच्या फिल्मी करिअरमध्ये अनेक सुपरहिट सिनेमे दिले. 'दरवाजा, ये है जिंदगी', 'वो मैं नहीं' यांसारख्या चित्रपटांमध्ये त्यांनी काम केलं. चित्रपटांमध्ये वेगवेगळ्या व्यक्तिरेखा साकारून लोकांच्या मनावर आपल्या अभिनयाची छाप सोडली.



## मला स्वतःची लाज वाटली : मीरा जगन्नाथ

'माझ्या नवऱ्याची बायको', 'ठरलं तर मग', तसेच 'बिग बॉस मराठी' अशा मालिका व टीव्ही रिॲलिटी शोसाठी मीरा जगन्नाथ( MIRA JAGANNATH)ओळखली जाते. आता ती चित्रपटांतदेखील महत्त्वाच्या भूमिकांत दिसत आहे. अभिनयाबरोबरच अभिनेत्री तिच्या परखड वक्तव्यासाठी ओळखली जाते. आता नुकत्याच एका मुलाखतीत तिने तिच्या आयुष्यातील कठीण काळाबद्दल वक्तव्य केले आहे. अभिनेत्री मीरा जगन्नाथने नुकतीच 'राजश्री मराठी'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत मानसिक शांतता कशी जपतेस, असा प्रश्न तिला विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना अभिनेत्री म्हणाली, "आधी मला काही गोष्टींचा त्रास व्हायचा; पण आता मी प्रत्येक गोष्टीकडे सकारात्मक दृष्टीने बघते. एक छान गोष्ट तुमच्या आयुष्यात घडली किंवा एक छान व्यक्ती तुमच्या आयुष्यात आली की, आपोआप तुमच्या आयुष्यात सगळं छान होतं. मला यावर या काही महिन्यांमध्ये किंवा वर्षांमध्ये खूप विश्वास बसलाय. त्यामुळे तुम्ही आपोआप सकारात्मक होता. तुम्ही नकारात्मक लोकांपासून दूर राहा. मग ती तुमच्या कुटुंबातील असो किंवा बाहेरची असो. जी व्यक्ती तुम्हाला खूप छान वाटते, ज्याच्याबरोबर तुम्ही बोलल्याने चांगलं होतं. भले ती तुमची आई, वडील, बहीण, नवरा किंवा बॉयफ्रेंड असेल, असे लोक तुमच्या आयुष्यात असू द्या."पुढे अभिनेत्रीने तिच्या आगामी प्रोजेक्टबद्दल खुलासा केला. मीरा जगन्नाथ म्हणाली, "एप्रिलमध्ये दोन इव्हेंट्स करीत आहे. जून-जुलैमध्ये आमचा येरे येरे पैसा ३ हा चित्रपट प्रदर्शित होतोय. त्यानंतर अजून दोन चित्रपट आहेत. एक नोव्हेंबरमध्ये आहे आणि एक जुलैमध्ये शो सुरू होणार आहे. आता मी कामाच्या संख्येपेक्षा गुणवत्तेवर लक्ष देत आहे.२०२५ नुकतंच सुरू झालं असून या वर्षासाठी काही स्वत:साठी ठरवलं होतं का, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर मीरा म्हणाली, "कामावर लक्ष द्यायचं, कुटुंबाला वेळ द्यायचा.

# आरसीबीची विजयासह 'विराट' सुरूवात

## केकेआरचा घरच्या मैदानावर पराभव; कोहली-सॉल्टची वादळी फलंदाजी

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने विजयाने सुरूवात केली आहे. आरसीबीने केकेआरला त्यांच्या घरच्या मैदानावर ७ विकेट्सने पराभूत केलं. आरसीबीने ३ वर्षांनंतर केकेआरवर शानदार विजय मिळवला आहे. विराट कोहली आणि फिल सॉल्टची ९५ धावांची भागीदारी अन् विराट कोहलीच्या धावांसह आरसीबीने पहिल्याच सामन्यात उत्कृष्ट विजय नोंदवला. गतविजेत्या केकेआर संघाला अटीतटीची लढत देत सामन्यात दणक्यात पुनरागमन करत मोठा विजय नोंदवला.**




पहिल्याच सामन्यात आरसीबीने चमकदार कामगिरी करत गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स संघाचा घरच्या मैदानावर पराभव केला. २२ मार्च रोजी ईडन गार्डन्सवर झालेल्या सलामीच्या सामन्यात केकेआरने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १७५ धावांचे लक्ष्य दि होते. आरसीबीने हे लक्ष्य अवघ्या १६.२ षटकांत गाठले. विराट आणि सॉल्टने वादळी सुरूवात करत ९५ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. बेंगळुरूने कोलकाताविरुद्ध आयपीएलमध्ये ३ वर्षांनंतर विजय मिळवला आहे. यापूर्वी २०२२ च्या मोसमात आरसीबीने केकेआरचा पराभव केला होता. या दमदार विजयासह आरसीबीने गुणतालिकेत आपले खातेही उघडले आहे. आरसीबीने १७व्या षटकात हा सामना जिंकल्याने त्यांचा नेट रन रेटही चांगला झाला आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या या दमदार विजयात फिल सॉल्ट, विराट कोहली, कृणाल पंड्या आणि नवा कर्णधार रजत पाटीदार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तिघांनीही आपल्या स्फोटक फलंदाजीने सामन्यात एकतर्फी विजय मिळवला आणि केकेआरला सामन्यात पुनरागमन करण्याची संधी दिली नाही. १७ धावांचा पाठलाग करताना सॉल्ट आणि कोहलीने पहिल्या ६ षटकांत ८० धावा केल्या. या दोघांनी केवळ ८.३ षटकांत ९५ धावांची सलामी भागीदारी रचली.१८० च्या स्ट्राईक रेटने ३१ चेंडूत ९ चौकार आणि २ षटकारांसह ५६ धावा करून सॉल्ट वरुण चक्रवर्तीच्या गोलंदाजीवर बाद झाला. देवदत्त पडिक्कलही १० चेंडूत १० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला, पण या दोघांच्या बाद झाल्याचा बंगळुरूवर फारसा परिणाम झाला नाही. यानंतर आलेल्या कर्णधार रजत पाटीदारने १६ चेंडूत ५ चौकार आणि एका षटकारासह ३४ धावा करत संघाचा विजय सोपा केला.

### कोहली-सॉल्टची वादळी फलंदाजी

याशिवाय लियाम लिव्हिंगस्टोनने ५ चेंडूत २ चौकार आणि एका षटकारासह १५ धावा करत संघाला विजय मिळवून दिला. या विजयात विराट कोहलीची भूमिका महत्त्वाची होती. सलामीला आलेला विराट ३६ चेंडूत ९ चौकार आणि २ षटकारांसह ५९ धावा करत नाबाद परतला.तत्पूर्वी नाणेफेक गमावत केकेआरचा संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला. पहिल्याच षटकात क्विंटन डिकॉकने चौकारासह सुरूवात केली. यानंतर सुयश शर्मानं त्याचा साधा झेल सोडला. पण अखेरीस हेझलवूडने त्याला पहिल्याच षटकात झेलबाद करत संघाला पहिली विकेट मिळवून दिली. यानंतर केकेआरकडून कर्णधार अजिंक्य रहाणेने अर्धशतकी खेळी करत आणि सुनील नरेन यांनी शतकी भागीदारी करत १० षटकांच्या आत १०० धावा केल्या. पण आरसीबीने आपली गोलंदाजी सुरू ठेवत रसिख दर सलामने संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिला.

# सुनील नरेनने स्टंपसवर मारली बॅट!

## तरीही दिलं नाही हिट विकेट आऊट; नेमका नियम काय?

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएल २०२५ ची दणक्यात सुरूवात झाली आहे. केकेआर आणि आरसीबी यांच्यातील पहिल्याच सामन्यातील पहिल्या डावात अटीतटीची लढत पाहायला मिळाली. आरसीबीने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. केकेआरच्या फलंदाजांनी चांगलीच धुलाई केली, पण आरसीबीनेही कमालीचं पुनरागमन करत केकेआरला मोठी धावसंख्या उभारू दिली नाही. पण या सामन्यात सुनील नरेनने स्टंपसवर बॅट मारल्याची घटना घडली, पण त्याला बाद देण्यात आले नाही.**




आरसीबीने गोलंदाजीला चांगली सुरूवात करत पहिल्या दोन षटकांत एक विकेट मिळवत केकेआरला ५ धावा करू दिल्या. पण नंतर अजिंक्य रहाणे आणि सुनील नरेन यांनी शतकी भागीदारी करत १० षटकांच्या आत १०० धावांचा टप्पा गाठला. पण सततच्या विकेटमुळे केकेआरचा संघ ८ विकेट गमावत १७४ धावाच करू शकला. केकेआरची सुरूवात पाहता संघ २०० धावांचा टप्पा सहज गाठू शकेल, असे वाटत होते पण आरसीबीने कमालीचा पुनरागमन केलं. ज्यामध्ये क्रुणाल पंड्याने ३ विकेट्स घेतले.केकेआरचा सलामीवीर सुनील नरेनने पहिल्या डावात मोठी चूक केली. ज्यामुळे तो बाद झाला असता, पण मैदानात काहीतरी वेगळंचं घडलं. नरेनने या डावात त्याच्या बॅटने बॉलला जोरदार फटका मारला पण त्याने त्याची बॅटही विकेटवर मारली. मात्र असे असूनही त्याला हिटविकेट देण्यात आली नाही, ज्यामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. पण नेमका काय नियम आहे, जाणून घेऊया.आठव्या षटकात रसिख दर सलामच्या षटकात सुनील नरेनबरोबर ही घटना घडली. रसिकच्या या षटकातील चौथा चेंडू शॉर्ट पिच होता. नरेनने खेळण्याचा प्रयत्न केला पण शेवटच्या क्षणी बॅट बाजूला केली. चेंडू त्याच्या डोक्यावरून गेला आणि विकेटकीपरच्या हातात गेला. विकेटकीपरने चेंडू टिपला आणि काही सेकंदातच नरेनची बॅट स्टंपला लागली.बॅट स्टंप्सवर आदळताच बेल्स पडल्या आणि आरसीबीचे क्षेत्ररक्षक उत्साहित आणि थोडे गोंधळलेले दिसले. नरेनला कदाचित हिट-विकेट आऊट मिळेल.

### चेंडू रिव्हर्स स्विंग होण्यास मदत – सिराज

अशी त्यांना आशा होती. पण पंचांनी तसे केले नाही आणि यामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. नियमानुसार पंचांचा निर्णय योग्य होता.मेरीलेबोन क्रिकेट क्लब म्हणजेच MCC च्या नियम ३५.२ नुसार, चेंडू खेळण्याच्या प्रक्रियेनंतर फलंदाजाची बॅट किंवा शरीराचा भाग लागून बेल्स पडल्यास तो खेळाडू नाबाद मानला जाईल. म्हणजे एक चेंडू पूर्ण खेळून झाल्यानंतर त्याच्या बॅटमुळे स्टंपवरील बेल्स पडतात, तर तो फलंदाज नाबाद ठरतो. असंही तो चेंडू पंचांकडून वाईड देण्यात आला, त्यामुळे तो चेंडू गणला गेला नाही, त्यामुळे हिट विकेटचा प्रश्नच नव्हता. नरेनच्या बाबतीतही असंच घडले. चेंडू यष्टिरक्षकाच्या हातात गेला होता. नरेन त्याच्या जागी उभा होता आणि हात मागे केल्याने बॅट स्टंपला लागली. तसेच, बॅट स्टंपला लागण्यापूर्वीच अंपायरने तो चेंडू वाइड बॉल दिला होता, त्यामुळे या चेंडूची क्रिया पूर्ण झाली होती.आयपीएल २०२५ ची दणक्यात सुरूवात झाली आहे. केकेआर आणि आरसीबी यांच्यातील पहिल्याच सामन्यातील पहिल्या डावात अटीतटीची लढत पाहायला मिळाली. आरसीबीने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. केकेआरच्या फलंदाजांनी चांगलीच धुलाई केली, पण आरसीबीनेही कमालीचं पुनरागमन करत केकेआरला मोठी धावसंख्या उभारू दिली नाही.

स्मार्ट PCMC
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
। दि. 23 मार्च 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## आपली मानसिकता, यश आणि जीवनावर प्रभुत्व विषयावर व्याख्यान

# ‘सातत्य, जिद्द, कठोर परिश्रमामुळे अपेक्षित यश!

## व्याख्याते सिद्धार्थ शहा : प्रतिभा इन्स्टिट्यूटमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट मध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांना प्रेरणा मिळावी यासाठी थिंक अँड ग्रो रीच अकॅडमी इंडियाचे संस्थापक आणि सीईओ, आंतरराष्ट्रीय व्याख्याते सिद्धार्थ शहा यांचे आपली मानसिकता, यश आणि जीवनावर प्रभुत्व या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन व्याख्याते सिद्धार्थ शहा यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले.**




यावेळी व्यासपीठावरती हेतल शहा, कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ दीपक शहा , मॅनेजमेंटचे संचालक डॉ. सचिन बोरगावे, विभाग प्रमुख प्रा . गुरुराज डांगरे , कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक प्रा. मनीष पाटणकर, विशेष आमंत्रित रवी वर्मा ,विद्यार्थी प्रतिनिधी सिद्धार्थ क्षीरसागर , कृपालिनी सुतार , प्राध्यापका समवेत सुमारे 300 विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी डॉ. दीपक शहा यांच्या हस्ते सिद्धार्थ शहा, हेतल शहा यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्याख्याते सिद्धार्थ शहा पुढे म्हणाले, तुम्ही जे शिक्षण घेत आहात ते मनापासून शिकण्याची तयारी ठेवा. पुस्तकाबरोबर मैत्री करा. कामाव्यतिरिक्त मोबाईल पासून इतर वेळी दूर राहा. नियमित अभ्यास करा. आळस झटकून टाका . नंतर करू ही मनाची मानसिकता बदलून टाका. गेलेली वेळ परत येत नाही. आपले भावी भवितव्य आपल्यालाच घडवायचे आहे हे लक्षात घेऊन, वेळीच योग्य निर्णय घ्या.अंगी शिस्तीचे अनुकरण करा .स्वयंशिस्त नसणे हे दुर्दैव असते, माझं काहीच होणार नाही ही नकारात्मक जीवनशैली झटकून टाका. समस्या आव्हाने आले तरी त्यातूनच यशस्वीतेचा मार्गही असतो ,यश मिळेल का या मानसिकतेमध्ये अडकून राहू नका. सतत चिकित्सक रहा. दैनदिन जीवनात स्वतःची मानसिकता उत्तम ठेवा. प्रसंगी खच खाऊ नका. अभ्यासक्रमाला पूरक पुस्तके खरेदी करून त्याचे वाचन करा. यावेळी संचालक डॉ. सचिन बोरगावे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ क्षीरसागर यांनी केले तर आभार मुख्य समन्वयक प्रा. मनीष पाटणकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थी घडवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील : डॉ. दीपक शहा कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा आपल्या अध्यक्षीय मनोगतात म्हणाले की, संस्थेने विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध केल्या आहे. उत्तम प्राध्यापक वर्ग आहे. विद्यार्थानी स्वतःमध्ये बदल कोठून कसा करावयाचा याचा विचार प्रत्येकाने व सतत केला पाहीजे . भावी आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर , तुमच्या मनामध्ये दृढ इच्छा असली तरी मनात चालढकल असेल तर,भावी आयुष्यात काहीच करू शकणार नाही. अपेक्षीत यशापासून दूर राहाल. लक्षात ठेवा ब्रह्मदेवाने सर्वांना सारखीच बुद्धी वाटलेली आहे. आपल्या बुद्धीच्या योग्य वापर करा. शून्यातून यशस्वी होता येते, याचे अनेक उदाहरणे देत , आयुष्यात मलाही काहीतरी व्हायचच आहे, याची खून गाठ प्रत्येकानी मनाशी बाधा . ज्याच्या मनात ज्वाला अग्नी पेटलेला असतो , तीच माणसे भविष्यात यशस्वीतेच्या शिखरावर जातात .असे सांगून डॉ. शहा पुढे म्हणाले , संस्था तुमच्या उज्वल भवितव्यासाठीच विविध उपक्रमाचे आयोजन करते , त्यापासून स्फुरण घ्यावे ,असे आवाहन देखील केले.




Since 2000
चला संस्कारक्षम पिढी घडवूया
बालभवन मध्ये सहभागी होऊया
आविष्कार बालभवन
स्वत:चे रंग, रूप, गंध, घेऊन मुलांचे व्यक्तिमत्व फुलवणारे
• चित्रकला
• सूर्यनमस्कार
• प्राणायाम
• मंत्रपठण
• सण उत्सव परंपरा
• श्लोक
• हस्तकला
• गप्पा गोष्टी
• नाट्य
• नृत्य
• क्रीडा प्रकार तोंडओळख
• स्पर्धांची तयारी
(श्लोक, वकतृत्व , नाट्यछटा)
विशेष आकर्षण
मंगल स्मृती आविष्कार च्या परीक्षा घेतल्या जातील
आणि त्याचे प्रमाणपत्र हि दिले जाईल
हे सर्व एकाच ठिकाणी घेऊन येत आहोत आपल्यासाठी
कालावधी
सोमवार ते शुक्रवार (१ तास )
वयोगट
४-१० वर्षापर्यंत
Time : 6 pm - 7 Pm | Address : MSS School,
Near Shridhar Nagar Garden, Chinchwad
For Admission Contact: 9011270556

# मोरया शिक्षण संस्था

## Computer Vacation Batch

**ADMISSIONS OPEN 2025-26**



| | | | |
|---|---|---|---|
| 'C' भाषा ₹ १३००/- | 'C++' भाषा ₹ १३००/- | बेसिक जावा ₹ १३००/- | स्क्रॅच ॲनिमेशन ₹ १३००/- |
| बेसिक टॅली ₹ १५००/- | एम.एस. ऑफिस ₹ १५००/- | कोरल ड्रॉ ₹ ११००/- | Adobe AB फोटोशॉप ₹ ११००/- |

सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.

ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100


EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org